N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** हिंगोली
**P.S.(ठाणे):** हिंगोली शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0792
**Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**25/11/2024 19:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार
**Date From (दिनांक पासून):** 25/11/2024
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date To ( दिनांक पर्यंत):** 25/11/2024
**Time From (वेळेपासून):** 14:23 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:33 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 25/11/2024
**Time (वेळ):** 18:52 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 027
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/11/2024 18:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 01 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** रामाकष्णालॉंज हॉटेलदराडेसमोर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विष्णु मारोतराव इंगोले

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कुरुंदा,वसमत,कुरुंदा,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कुरुंदा,वसमत,कुरुंदा,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7020005491

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मनोज मधुकर मगरे | | | 1. देवानगरी शाहनुरवाडी, छसंभाजीनर,छसंभाजीमगर, ओरस्मानपुरा ,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

त्वरीत

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

25.11.2024 दिनांक:-

फिर्याद

मी, श्री विष्णु मारोतराव इंगोले वय 36 वर्षे व्यवसाय शेती व केळी चिप्स बनविण्याचा व्यवसाय रा. कुरूंदा ता. वसमत जि. हिंगोली मो.क्र. 7020005491
समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली येथे फिर्याद देतो की, मी दिनांक 22.11.2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो हिंगोली येथे श्री विकास घनवट, पोलीस उप अधिक्षक, यांचेकडे लेखी तक्रार दिली होती की, माझे नावे कुरूंदकर फार्मस प्रोडयुसर कंपनी लि. या नावाने नोंदणीकृत कंपनी असुन सदर कंपनीचे माध्यमातुन मी कुरूंदा येथे कच्च्या केळी पासुन चिप्स बनवुन विक्री करण्याचा व्यवसाय मागिल चार वर्षा पासुन करीत आहे. मी सदर व्यवसायासाठी जिएसटी रजिस्ट्रेशन क्रमांक 27 AAHCK8790P1ZH असा घेतलेला असुन सदर जिएसटी क्रमांकावर एप्रिल 2024 पासुन व्यवसाय सुरू आहे.
मी मागिल सहा महिन्यांपासुन कंपनीचे जिएसटी रिटर्न दाखल न केल्यामुळे दिनांक 07.10.2024 रोजी मला जिएसटी कार्यालयाकडून माझे कंपनीचे मेल वर सिस्टीम जनरेटेड नोटीस प्राप्त झाली त्यामध्ये Show Cause Notice for cancellation of Registration असे नमुद असुन, मला दिनांक 04.11.2024 रोजी हजर राहणे बाबत कळविलेले होते. परंतु माझे व्यवसायाचे कामा मुळे मी सदरचा मेल पाहिला नाही.
त्यानंतर दिनांक 07.11.2024 रोजी जि.एस.टी कार्यालयातील अधिकारी यांचा माझे मोबाईलवर फोन आला. तेव्हा ते मला म्हणाले की, ''मी मनोज मगरे जिएसटी ऑफिस हिंगोली येथुन बोलतोय तुम्ही तुमचे कंपनीचे जिएसटी रिटर्न दाखल केले नसल्याने तुमच्या कंपनीचे जिएसटी रजिस्ट्रेशन कॅन्सल करण्यात येईल रजिस्टेशन कॅन्सल करायचे नसेल तर तुम्ही हिंगोली येथे जिएसटी कार्यालयात येवुन भेटा.'' त्यावरून मी माझे सिए यांचेकडे जावुन त्यांना सदरबाबत माहिती दिली असता, त्यांनी मला मागील सहा महिन्याचे कंपनीचे जिएसटी रिटर्न भरून घेण्यास सांगीतले. तेव्हा मी त्यांचे मार्फतीने ऑनलाईन पध्दतीने कंपनीचे जिएसटी रिटर्न भरून त्यावरील दंडाची रक्कम देखील भरून घेतली. मी कंपनीचे जिएसटी रिटर्न भरल्यामुळे माझे कंपनीची जिएसटी रिटर्न न भरल्याबाबतची नोटीस कॅन्सल केले बाबत मला दिनांक 08.11.2024 रोजी कंपनीचे मेल वर जिएसटी कार्यालयाकडून सिस्टीम जनरेटेड ऑर्डर प्राप्त झाली आहे. त्यामुळे मी जिएसटी कार्यालय हिंगोली येथील अधिकारी श्री मनोज मगरे यांना हिंगोली येथे भेटण्यास गेलो नाही.
त्यानंतर दिनांक 22.11.2024 रोजी जिएसटी कार्यालय हिंगोली येथील अधिकारी यांचा मला फोन आला की, तुम्ही मला भेटायला हिंगोली येथे या नाहीतर मी तुमचे कंपनीचे जिएसटी रजिस्ट्रेशन कॅन्सल करण्यासाठी पाठवतो. तेव्हा मी त्यांना विनंती केली की मी तर जिएसटी रिटर्न पुर्ण भरले असुन माझी नोटीस पण कॅन्सल झालेली आहे. तेव्हा त्यांनी मला भेटायला बोलुन सगळेच फोनवर बोलता येत नाही. तुमचे कंपनीचे जिएसटी रजिट्रेशन कॅन्सल करायचे नसेल तर 10000/- लागतील असे म्हणुन पैशाची मागणी केली असुन मला दिनांक 22.11.2024 रोजी जिएसटी रिटर्न घेवून जिएसटी कार्यालय हिंगोली येथे बोलविले आहे.
मी कंपनीचे जिएसटी रिटर्न भरल्यामुळे माझे कंपनीची जिएसटी रिटर्न न भरल्याबाबतची दिनांक 07.10.2024 रोजीची नोटीस कॅन्सल झालेली असतांना माझे कपंनीचे जिएसटी रजिस्ट्रेशन कॅन्सल न करण्यासाठी व कंपनीचे जिएसटी रजिस्टेशन कॅन्सल करण्यासाठी वरीष्ठांकडे पाठविले नाही म्हणुन श्री मगरे यांनी मला 10000/- रू पैशाची मागणी केलेली होती त्यावरून मी त्यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही करावी अशी तक्रार दिली होती.
त्यानंतर ला.प्र.वि हिंगोली पोलीस उप अधिक्षक श्री विकास घनवट यांनी शासकिय कार्यालयातुन दोन पंच नामे

श्री अंबादास लक्ष्मण कुहीरे, कनिष्ठ सहायक व श्री सुनिल पांडुरंग सोरते, ग्रामसेवक दोन्ही नेमणुक पंचायत समिती औंढा ना. यांना बोलावुन घेवून त्यांना माझा व मला त्यांचा परीचय करून दिला व मी दिलेली लेखी तक्रार त्यांना वाचुन दाखविण्यात आली होती.
त्यानंतर दिनांक 22.11.2024 रोजी करण्यात आलेल्या तक्रार पडताळणी कार्यवाही दरम्यान मी, पंच क्र.1 श्री अंबादास कुहीरे यांचेसह मनोज मगरे, यांची भेट घेण्या करीता हिंगोली येथील रामाकृष्णा लॉज जवळील हॉटेल दराडे येथे गेलो असता तिथे मनोज मगरे, यांची भेट झाली. तेव्हा माझे कामासंबधी बोलणी करीत असतांना मनोज मगरे, यांनी माझे कपंनीचे जिएसटी रजिस्ट्रेशन कॅन्सल न करण्यासाठी व कंपनीचे जिएसटी रजिश्ट्रेशन कॅन्सल करण्यासाठी वरीष्ठांकडे पाठविले नाही याचा मोबदला म्हणुन 10000/- लाचेची मागणी करून 10000/- रू लाच रक्कम स्वीकारण्याची सहमती दर्शवीली आहे.
त्यावरून दिनांक 25.11.2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली येथे सापळा पुर्व कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर मी लाच म्हणून देण्यासाठी आणलेले 10,000/- रू. (500/- रू. चे 20 नोटा) चे नंबर व वर्णन एका कागदावर टंकलिखित करण्यात आले होते. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक विकास घनवट यांनी अँन्थ्रॉसीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहिती देवून त्याचे प्रात्यक्षिक सपोउपनि युनुस शेख यांचे करवी करून दाखविले व लाच म्हणुन दयावयाच्या नोटांना दोन्ही बाजुने अँन्थ्रॉसीन पावडर लावली. त्यानंतर लाच स्विकारल्या नंतर करावयाचा ईशाऱ्या बाबत पोलीस उप अधिक्षक विकास घनवट यांनी मला व पंच, सापळा पथकातील सर्व सदस्यांना योग्य त्या सुचना दिल्या
त्यानंतर दिनांक 25.11.2024 रोजी मी, पंच व सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी असे मनोज मगरे, जिएसटी अधिकारी यांना भेटण्यासाठी रामाकृष्णा लॉज जवळील दराडे हॉटेलवर भेटण्यासाठी रवाना झालो. तेव्हा माझी मनोज मगरे, जिएसटी अधिकारी यांची तेथे भेट झाली. तेव्हा मनोज मगरे, जिएसटी अधिकारी, यांनी लाचेची रक्कम 10000/- रू त्यांचे डाव्या हाताने स्वीकारली त्यावरून मी सापळा पथकास लाच स्विकाल्याचा ईशारा केला. तेव्हा सापळा पथकाने मनोज मगरे, जिएसटी अधिकारी, यांना 14.23 वा. सुमारास रामाकृष्णा लॉज जवळील हॉटेल दराडे समोरील जागेत हिंगोली येथे ताब्यात घेवून त्याचेकडून लाचेची रक्कम 10000/-रू. जप्त केली. त्यानतर मनोज मगरे, जिएसटी अधिकारी यांना सापळा पथकाने ताब्यात घेतले आहे.
तसेच पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान माझे व मनोज मगरे, जिएसटी अधिकारी यांचेशी प्रत्यक्ष भेटी दरम्यान झालेले संभाषण हे व्हाईस रेकॉर्डरद्वारे मेमरी कार्डमधे रेकॉर्ड करण्यात आले आहे.
तरी लोकसेवक मनोज मधुकर मगरे वय 49 वर्षे, व्यवसाय नौकरी, पद सुप्रीटेंड, सी.जी.एस.टी. कार्यालय हिंगोली वर्ग 2 रा. उदयोग सिध्दांत अपार्टमेंट, दुसरा माळा, फ्लॅट क्र ए-7, देवानगरी शाहनुरवाडी, छत्रपती संभाजी नगर यांनी त्याचे पदाचा दुरूपयोग करून त्यांना मिळणारे परिश्रमिका खेरीज 10000/- रू लाचेची मागणी करून दिनांक 25.11.2024 रोजी रामाकृष्णा लॉज जवळील दराडे हॉटेल समोर हिंगोली येथे 10000/- रू लाचेची रक्कम स्वतः स्विकारली म्हणुन त्याचे विरूध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी म्हणून मी फिर्याद देत आहे. माझी वरील फिर्याद मी सापळा कार्यवाही झाल्यानंतर ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली येथे आज दिनांक 25.11.2024 रोजी पोलीस उप अधिक्षक विकास घनवट यांना तोंडी सांगितली असून ती संगणकावर टंकलिखित केली असून माझे वरील फिर्यादीची प्रींट काढल्यावर मी माझी फिर्याद वाचून पाहिली असून ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

सही -

(विकास घनवट)
पोलीस उप अधिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली.

विष्णु मारोतराव इंगोले

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
VIKAS MAROTI GANWAT
**Rank (पद):** Dy. SP (Deputy Superintendant **No.(क्र.):** DGPVMGM8101
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** narendra bhimrao p
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 50686

पोलीस ठाणे अमलदार
पा.स्टे.हिंगोली 'शहर'